# फसवणूकीचा त्याग करण्याची घोषणा करणारी प्रार्थना

पित्या, मी तुझे उपकार मानतो की तू सत्याचा परमेश्वर आहेस, की तू काळोख्या रात्री आपला प्रकाश चमकवितोस. आज मी अंधकारात नव्हे, तर तुझ्या प्रकाशात जगण्याची निवड करीत आहे.

कृपया मी जे खोटे बोललो त्याबद्दल मला क्षमा कर. मी अनेकदा सुखाचा मार्ग निवडला आणि योग्य मार्ग निवडण्याऐवजी कोणता सोपा मार्ग आहे तो निवडला. हे प्रभू, मी तुला विनंति करतो की माझे ओठ सर्व प्रकारच्या वाईटापासून साफ कर. मला असे अंतःकरण दे जे सत्य ऐकून आनंदित होते. आणि असे तोंड दे जे इतरांना सत्य सांगायला तत्पर आहे.

मला सत्यात सांत्वन प्राप्त करण्यास व खोटेपणाचा नाकार करण्यासाठी धैर्य दे.

आज मी माझ्या दैनंदिन जीवनात खोट्या गोष्टींचा वापर नाकारतो आणि त्यांचा त्याग करण्याची घोषणा करतो.

सत्य म्हणून खोटेपणाचे समर्थन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या इस्लामच्या सर्व शिकवणी मी नाकारतो, यात **तकिय्याह**चाही समावेश आहे. मी सर्व लबाडी आणि फसवणूकीपासून दूर जाणे निवडले आहे. मी सत्यात जगणे निवडले आहे.

मी घोषणा करतो कि येशू ख्रिस्त हा मार्ग, सत्य व जीवन आहे.

मी या सत्याच्या संरक्षणात राहण्याची निवड करतो.

मी घोषणा करतो की माझे संरक्षण तुझ्याठायी आहे, आणि सत्य मला स्वतंत्र करील.

कृपा करून हे स्वर्गीय पिता, मला दाखवून दे की तुझ्या सत्याच्या प्रकाशात कसे चालावे. मला बोलण्यासाठी शब्द दे, आणि ज्या मार्गाने चालावे तो मार्ग दाखव, जो तुझ्या सत्यावर आधारित आहे.